# मिरा भाईंदर महानगरपालिका

शुभम आर्केड, पहिला माळा, डी-मार्ट परिसर
M.I.R.A. हॉस्पिटलच्या पुढे, भाईंदर (प.) जि.ठाणे ४०१ १०१


## जाहिरात विभाग

जा.क्र.मनपा/जाहिरात/३१६/२०२४-२५ दि. १७/१०/२०२४

प्रति.,
**सिस्टीम मॅनेजर**
**संगणक विभाग**
**मिरा भाईंदर महानगरपालिका.**

विषयः- **जाहिर प्रकटन प्रसिध्द करणेबाबत.**

मिरा भाईदर महानगरपालिका क्षेत्रात जाहिरात ठेका होर्डिंग व खाजगी होर्डिंगधारक यांना ठेका होर्डिंग / खाजगी होर्डिंगबाबत जाहिर प्रकटनाची प्रसिध्द करावयाचे आहे. तरी सदर जाहिरात प्रकटनास महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यांत यावे.

**सोबत :- जाहिर प्रकटन प्रत.**

(कल्पिता पिंपळे)
**उपआयुक्त (जाहिरात)**
**मिरा-भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

शुभम आर्केड, पहिला माळा, डी-मार्ट परिसर
M.I.R.A. हॉस्पिटलच्या पुढे, भाईंदर (प.) जि.ठाणे ४०१ १०१

## जाहिरात विभाग


जा.क्र.मनपा/जाहिरात/३९४ /२०२४-२५ दि. १४ / १०/२०२४

## // जाहीर प्रकटन //

**विषय :- सार्वत्रिक विधानसभा निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने होर्डिंगवरील राजकीय व इतर जाहीराती बाबत.**

वरील विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, सार्वत्रिक विधानसभा निवडणूक २०२४ ची आदर्श आचारसंहिता लवकरच लागण्याची शक्यता आहे. त्या अनुषंगाने मिरा-भाईंदर महानगरपालिका जाहीरात विभागामार्फत खाजगी व महानगरपालिकेच्या जागेवर ठेक्याने उभारलेल्या होर्डींग इत्यादींवर निवडणूक कालावधीत राजकीय व इतर जाहीरात प्रसिध्द करावयाची असल्यास संबंधित होर्डींगधारकांनी महानगरपालिकेची परवानगी घेणे बंधनकारक आहे.

ज्या होर्डींगधारकांची मागील सन २०२३-२४ व चालु सन २०२४-२५ च्या आर्थिक वर्षातील जाहीरात फी थकित असेल अशांनी त्वरीत जाहीरात फीचा भरणा करावा. जाहिरात प्रसिध्द करावयाची असल्यास रोस्टर पध्दतीने व सम न्यायिक पध्दतीने संबंधित कार्यक्षेत्रातील विधानसभा मतदारसंघाचे निवडणुक निर्णय अधिकारी व महानगरपालिकेची पुर्व परवानगी घेणे बंधनकारक आहे.

ज्या होर्डींगधारकांना परवानगी नसेल व मागील सन २०२३-२४ व चालु सन २०२४-२५ या आर्थिक वर्षातील जाहीरात फी थकित आहे, त्यांनी जाहीरात प्रसिध्द केल्यास आचारसंहितेचा भंग समजून एजन्सी/ होर्डींग मालकावर गुन्हा दाखल करून होर्डींग जप्त करण्याची कारवाई करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

कल्पिता पिंपळे
उपायुक्त (जाहिरात)
मिरा-भाईंदर महानगरपालिका.